30-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/29/2025 8:59 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



वेर्णा, रविवार, ३० मार्च २०२५ | पान २

## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमक; १६ नक्षलवाद्यांना ठार

**गडचिरोली, दि. २९:** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील केरलापालच्या जंगल परिसरात सुरु असलेल्या चकमकीत १६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. शनिवारी सकाळी ८ वाजतापासून ही चकमक सुरु असून मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते, अशी शक्यता छत्तीसगड पोलिसांनी वर्तवली आहे. सुकमा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्याच्या केरलापाल जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. यावरून सुकमा पोलिस दलाचे डीआरजी पथक आणि बिजापूर जवानांनी २८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबविले होते. दरम्यान, २९ मार्चला सकाळी ८ वाजताच्या सुमारास पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाली. यावेळी दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. यात १६ नक्षलवादी ठार झाले. तर दोन डीआरजी जवान जखमी झाले. अजूनही चकमक सुरु असल्याने मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आत्तापर्यंत घटनास्थळावरून १६ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहे.

-----------

### आसारामला जामीन मंजूर

**अहमदाबाद, दि. २९ :** गुजरात उच्च न्यायालयाने वैद्यकीय अहवालाच्या आधारे बलात्काराचा दोषी आसारामला तीन महिन्यांचा जामीन मंजूर केला आहे. आसारामने ६ महिन्यांचा जामीन मागितला होता. सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती ए. एस. सुपेहिया यांनी न्यायमूर्ती इलेश व्होरा यांच्या मताचे समर्थन केले आणि आसारामला तीन महिन्यांचा जामीन मंजूर करण्यात आला. २०२३ मध्ये सत्र न्यायालयाने आसारामला २०१३ च्या बलात्कार प्रकरणात दोषी ठरवले होते आणि तो जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. आसारामच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की डॉक्टरांनी त्याला सांगितले आहे की, त्याला ९० दिवसांच्या पंचकर्म उपचारांची आवश्यकता आहे. हे उल्लेखनीय आहे की या वर्षी जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने आसारामला वैद्यकीय कारणास्तव ३१ मार्चपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला होता.

-------------

### नेपाळमध्ये हिंसक निदर्शनात दोघांचा मृत्यू

**काठमांडू, दि. २९ :** नेपाळमध्ये राजेशाहीच्या मागणीसाठी झालेल्या हिंसक निदर्शनांत दोन जणांचा मृत्यू झाला. हिंसाचार भडकवणे, खासगी मालमत्तेचे नुकसान करणे आणि जाळपोळ करणे या आरोपाखाली पोलिसांनी १०५ जणांना अटक केली आहे. यामध्ये राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाचे उपाध्यक्ष रवींद्र मिश्रा, सरचिटणीस धवल शमशेर राणा यांचा समावेश आहे. याशिवाय स्वागत नेपाळ, शेफर्ड लिंबू आणि संतोष तमांग यांसारख्या राजेशाहीचे समर्थन करणाऱ्या कार्यकर्त्यांसह १७ इतर नेत्यांचाही समावेश आहे. गृह मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निषेधाचे मुख्य आयोजक नवराज सुबेदी यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. त्याच वेळी, या निदर्शनाचे मुख्य कमांडर दुर्गा परसाई यांचा शोध घेतला जात आहे. शुक्रवारी ४० हून अधिक नेपाळी संघटनांच्या निदर्शकांनी काठमांडूतील टिनकुने येथील एका इमारतीची तोडफोड केली आणि ती पेटवून दिली. निदर्शकांनी पोलिसांवरही दगडफेक केली, ज्याला प्रत्युत्तर म्हणून सुरक्षा कर्मचाऱ्यांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष

## शालेय परीक्षा व वेळापत्रक निश्चित | संचालक शेटगावकर यांची माहिती

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ : नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या दृष्टीने अधिक संधी मिळाव्यात, यासाठी एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'एससीईआरटी'च्या संचालक मेघना शेटगावकर यांनी ही माहिती पत्रकार परिषदेत दिली. यावेळी शिक्षण संचालक शैलेश झिंगडे, गोवा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये, तसेच 'एससीईआरटी'च्या सरिता गाडगीळ उपस्थित होत्या.**



शेटगावकर यांनी स्पष्ट केले की, शैक्षणिक वर्ष एप्रिलमध्ये सुरू करण्याच्या निर्णयावर काही आक्षेप नोंदवण्यात आले होते. यासंदर्भात शिक्षण खात्याने अधिसूचना काढली होती, ज्यावर ४०४७ हरकती प्राप्त झाल्या होत्या. सुकाणू समितीने या हरकतींची तपासणी करून त्यावर स्पष्टीकरण दिले. हरकतींमध्ये एप्रिलमधील उष्णता, शालेय सुविधा, विद्यार्थ्यांचे घटनात्मक हक्क, पाठ्यपुस्तकांचा पुरवठा, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि पालकांचा समावेश नसल्यासारख्या मुद्द्यांचा समावेश होता. मात्र, या सर्व आक्षेपांचे खंडन करण्यात आले असून ७ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी स्पष्ट केले की, नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात तालुकास्तरीय बैठका घेण्यात आल्या होत्या आणि पालकांना विश्वासात न घेतल्याचे आरोप निराधार आहेत. अनेक हरकतींत एकाच प्रकारचे मुद्दे उपस्थित केले गेले असून फक्त नावे व स्वाक्षऱ्या वेगवेगळ्या आहेत, असे त्यांनी नमूद केले. शासन विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत आहे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने परीक्षा प्रणालीतही काही बदल करण्यात आले आहेत. इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यभर एकाच वेळी परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका 'एससीईआरटी' तयार करणार आहे. इयत्ता नववी आणि दहावीच्या अंतिम परीक्षांसाठी मात्र प्रश्नपत्रिका गोवा शालान्त मंडळाद्वारेच तयार केल्या जाणार आहेत.

झिंगडे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, ७ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होईल आणि २९ एप्रिलपर्यंत इयत्ता नववीपर्यंतच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले जातील. काही पालक व शिक्षकांनी या निर्णयावर आक्षेप घेतले होते, त्यात वाढत्या उन्हाचा विचार न करणे, तसेच संबंधित घटकांना विश्वासात न घेण्यासारखे मुद्दे होते. मात्र, संभाव्य उष्णतेच्या लाटेचा विचार करून शाळेचे वेळापत्रक बदलण्यात आले असून सकाळी ११.३० वाजता शाळा सुटणार आहे. गरज भासल्यास शाळांना सुट्टी देण्याचाही पर्याय खुला ठेवण्यात आला आहे, असे शेटगावकर यांनी सांगितले.

# मंत्रिमंडळ फेरबदलाचे मुख्यमंत्र्यांनी दिले संकेत

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** राज्यातील मंत्रिमंडळातील सर्वच मंत्री चांगल्याप्रकारे कार्यरत असून, प्रत्येकाची कार्यशैली वेगळी आहे. कोणत्याही मंत्र्याला कार्यक्षमतेच्या मुद्द्यावरून दूर केले जाणार नाही. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीच्या दृष्टीने काही बदल करावे लागू शकतात, असे स्पष्ट संकेत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून मंत्रिमंडळ फेरबदल आणि काही मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची चर्चा रंगत आहे. काही दिवसांपूर्वीच विधानसभेचे सभापती रमेश तवडकर यांनी पंधरा दिवसांत फेरबदल होण्याची शक्यता असल्याचे संकेत दिले होते. त्यानंतर मुख्यमंत्री सावंत आणि भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी दिल्लीत जाऊन पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी गुप्त चर्चा केली. त्यामुळे मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेला अधिक धार आली आहे.

प्रदेशाध्यक्ष नाईक यांनी चार दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटी घेत मंत्रिमंडळ फेरबदलावर चर्चा केली. आता मंगळवारी पुन्हा मुख्यमंत्री सावंत आणि नाईक दिल्ली दौऱ्यावर जाणार असल्याने बदलांच्या शक्यतेला अधिक बळ मिळाले आहे. माझे मंत्रिमंडळ सक्षम असून, सर्वच मंत्री उत्तम कार्य करत आहेत. मात्र, आगामी निवडणुकीच्या दृष्टीने काही बदल आवश्यक आहेत. दोन नव्या आमदारांना मंत्रिमंडळात स्थान देण्याचा विचार सुरू आहे, असे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले.

भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीस बी. एल. संतोष यांच्या गोवा दौऱ्यादरम्यान प्रदेशाध्यक्ष नाईक यांनी मंत्रिमंडळात फेरफार आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यानंतर मंत्र्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी एक अहवाल तयार करण्यात आला होता, जो नुकताच दिल्लीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. त्यामुळे फेरबदलाच्या चर्चेला अधिक बळकटी मिळाली आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात नवीन प्रकल्प उभारण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू असून, गुंतवणुकीला चालना देण्यासाठी पावले उचलली जात आहेत. मात्र, या प्रकल्पांना अंतिम मंजुरी देण्याचा अधिकार नव्याने स्थापन झालेल्या सुकाणू समिती'कडे असेल. ही समिती मुख्यमंत्री सावंत यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असेल. समितीने संमती दिलेल्याच प्रकल्पांना परवानगी दिली जाईल,असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री सावंत यांनी आर्थिक व्यवस्थापनाबाबत सकारात्मक संकेत दिले असून, यंदा अपेक्षेपेक्षा अधिक महसूल प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. मागील वर्षी ४ हजार कोटी रुपयांच्या कर्जमर्यादेपैकी केवळ दीड हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले. तसेच, नवीन महसूल स्रोतांमधून राज्याच्या तिजोरीत भरीव वाढ झाली आहे. यंदाही सरकार शिलकी अर्थसंकल्प सादर करण्यास सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी सरकार कमी व्याजदराने कर्ज घेण्यावर भर देत आहे. यापूर्वी घेतलेल्या कर्जाच्या व्याजदरात कपात करण्यात आली असून, साधनसुविधा निर्मितीसाठी अधिक निधी खर्च केला जात आहे, असेही मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले.

# पोलिस मुख्यालयाला बॉम्बस्फोटाची धमकी

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** गोवा पोलिसांच्या मुख्यालयाला लक्ष्य करून बॉम्बस्फोट करण्याची धमकी मिळाल्याने शनिवारी सकाळी सुरक्षा दल सतर्क ठेवण्यात आले. या घटनेनंतर जवळपास सहा तास व्यापक शोधमोहीम राबविण्यात आली. पोलिस महासंचालक (डीजीपी) यांच्या अधिकृत ईमेल खात्यावर आलेल्या संदेशात डीजीपी कार्यालय आयईडी (इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइस) च्या मदतीने उडवून देण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता.

धमकीचा ईमेल प्राप्त होताच पोलिस यंत्रणा त्वरित सक्रिय झाली. कोणत्याही संशयास्पद हालचाली अथवा वस्तूंची तपासणी करण्यासाठी बॉम्ब शोधक आणि नाशक पथक तसेच डॉग स्क्वॉड तैनात करण्यात आले. संपूर्ण परिसराची कसून तपासणी करण्यात आली. गोवा पोलिसांचे प्रवक्ते आणि एसपी राहुल गुप्ता यांनी सांगितले की, सायबर क्राईम युनिटकडून ईमेलचा स्रोत शोधण्याचे काम सुरू आहे.

### सुरक्षा दल 'हाय अलर्ट'वर

शनिवारी सकाळी ९:०९ वाजता, डीजीपी गोवा यांच्या अधिकृत ईमेल आयडीवर आयईडी हल्ल्याची धमकी असलेला संदेश प्राप्त झाला. तत्काळ गोवा पोलिसांच्या सुरक्षा युनिट्स आणि जिल्हा पोलिसांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले. मानक कार्यद्धतीनुसार सर्व आवश्यक तपासणी करण्यात येत आहे. सायबर क्राईम युनिट ईमेलचा मूळ स्रोत शोधत आहे,असे गुप्ता यांनी सांगितले.

प्राथमिक तपासणीत कोणतीही स्फोटके किंवा सुरक्षा धोक्याचे अन्य पुरावे आढळले नाहीत. मात्र, संबंधित ईमेलमुळे सुरक्षा दलांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे, विशेषतः कारण हा संदेश एका इंग्रजी वृत्तपत्रालाही पाठवण्यात आला होता. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, धमकी कोणी आणि का दिली याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

# बँकॉकहून आलेल्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

## ११.६७ कोटींचा गांजा जप्त | केळरीयन नागरिकाला अटक

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** राज्यात झालेल्या सर्वात मोठ्या ड्रग्ज जप्तीपैकी एका कारवाईत, गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बँकॉकहून आलेल्या एका महिलेसह तिघांना अटक केली. या कारवाईत ११.६७२ किलो हायड्रोफोनिक गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत तब्बल ११.६७ कोटी रुपये आहे.

गोवा पोलिसांनी केलेल्या या मोठ्या कारवाईत गोल्डन ट्रँगलवर आधारित ड्रग्ज तस्करी रॅकेटला मोठा धक्का बसला आहे. या टोळीतील एका ड्रग्ज वाहतूकदारासह आंतरराष्ट्रीय पातळीवरील टोळीतील दोन सदस्यांना अटक करण्यात आली असून, इतर आरोपींच्या शोधासाठी तपास सुरू आहे.

गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेले आरोपींमध्ये गौथम एम (२६) सध्या गिरी , येथे वास्तव्यास असेलेला हा आरोपी मूळ केरळचा रहिवासी आहे. श्रीजिल पी. पी. हा केरळमधील कन्नूर येथील रहिवासी आहे तर अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव शिलना ए असून ती बँकॉक येथे राहणारी आहे.

८ मार्च रोजी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक तुषार लोटलीकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गिरी येथे छापा टाकून गौथम एम याला रंगेहाथ अटक केली. त्याच्याकडून हायड्रोपोनिक गांजाचे पारदर्शक पॉलिथिन पॅकेट जप्त करण्यात आले, ज्याचे वजन ११.६७२ किलो इतके आहे. ही तस्करी त्याने आपल्या भाड्याच्या घरात लपवली होती. पोलिसांनी पंचनामा करून संपूर्ण स्टॉक जप्त केला.

चौकशीत गौथमने कबूल केले की, बँकॉकमध्ये राहणाऱ्या तस्लीम नावाच्या व्यक्तीने त्याच्याशी संपर्क साधून भारतात ड्रग्ज पोहोचवण्यासाठी १ लाख रुपये देऊ केले होते. त्याच्या माहितीनुसार, १२ मार्च रोजी बेंगळुरूहून शिलना ए हिला अटक करण्यात आली. ती बँकॉकमधून काम करणाऱ्या मोठ्या गटाचा भाग असून, बंगळुरूमधील स्थानिक पुरवठादारांशी संपर्क साधत होती. या प्रकरणाच्या आर्थिक तपासादरम्यान, केरळच्या कन्नूरमधील श्रीजिल पी. पी. हा या टोळीचा आर्थिक व्यवस्थापक असल्याचे समोर आले. त्याने गौथम आणि इतर संशयित आरोपींसाठी आंतरराष्ट्रीय विमान प्रवासाची सोय केली होती. १९ मार्च रोजी पीआय किशोर रामानन यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकाने श्रीजिलला केरळमधील कन्नूर येथून अटक केली.

चौकशीतून स्पष्ट झाले की जप्त करण्यात आलेले ड्रग्ज गोव्यात विक्रीसाठी आणले गेले होते. गोवा पोलिसांनी आता या टोळीच्या थायलंडस्थित सदस्यांचा शोध घेण्यासाठी लूक-आउट सर्क्युलर आणि ब्लू नोटीस जारी केली आहे.

तिन्ही आरोपींविरुद्ध नार्कोटिक्स ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस कायद्याच्या कलम २० (ब) (ळळ) (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या पोलिस कोठडीत असून, पुढील तपास डीवायएसपी राजेश कुमार आणि एसपी (क्राइम ब्रांच) राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रशल देसाई करीत आहेत.

# वाळपई अपघातात तरुणाचा मृत्यू; तिघे गंभीर जखमी



टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. २९ :** येथील रेडेघाटी परिसरात झालेल्या दुचाकी अपघातात साखळी येथील २१ वर्षीय शॉन लोबो या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर तो चालवत असलेल्या दुचाकीवर मागे बसलेली महिला गंभीर जखमी झाली. तसेच दुसऱ्या दुचाकीवरील चालक आणि त्यांची महिला सहप्रवासी, जे पोलिस प्रशिक्षण शाळेतील प्रशिक्षणार्थी होते, गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातानंतर जखमींना तातडीने गोवा वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, शॉन लोबो आणि त्याची सहकारी साखळीहून वाळपईकडे जात असताना, पोलिस प्रशिक्षणार्थी विरुद्ध दिशेने येत होते. जखमींमध्ये ओला स्कूटरवरील प्रेक्षमा सतेंद्र कर्पे ( २० ) , वेळुस वाळपई येथील रहिवासी हिचा समावेश आहे. तसेच, अपघातात पोलिस प्रशिक्षण शाळेतील प्रशिक्षणार्थी मारुती करिअप्पा हरिजन (वय ५२, रहिवासी म्हापसा ) आणि राधिका राजेंद्र हालणकर (वय ४५, रहिवासी टेमवाडा, मोरजी) गंभीर जखमी झाले. पोलिसांनी या अपघाताचा तपास सुरू केला असून, अधिक चौकशीसाठी प्रत्यक्षदर्शी व अपघाताच्या ठिकाणच्या सीसीटीव्ही फूटेजची पाहणी केली जात आहे.

# म्यानमार भूकंपात १६४४ जणांचा मृत्यू

**नायपीडॉ, दि. २९ :**

म्यानमारमध्ये शुक्रवारी आलेल्या प्रलयंकारी भूकंपामुळे मृतांची संख्या १६४४ वर पोहोचली आहे, तर ३४०८ लोक जखमी झाले आहेत. याशिवाय १३९ लोक अद्याप बेपत्ता असल्याची माहिती लष्करी अधिकाऱ्यांनी दिली आहे. लष्करी राजवटीचे प्रमुख मिन आंग हलाईंग यांनी मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. भूकंपाच्या केंद्रस्थानी असलेल्या मंडालेमध्ये सर्वाधिक ६९४ मृत्यूंची नोंद झाली असून, राजधानी नायपीडॉमध्ये ९४ जणांचा मृत्यू झाला आहे. भूकंपाची तीव्रता ७.७ रिश्टर स्केल इतकी होती. त्याचा प्रभाव म्यानमारव्यतिरिक्त शेजारील थायलंडमध्येही जाणवला. थायलंडची राजधानी बँकॉकपर्यंत हादरे पोहोचले. या आपत्तीमध्ये थायलंडमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असून, १०० हून अधिक कामगार बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. भूकंपानंतर अवघ्या १२ मिनिटांत ६.४ तीव्रतेचा दुसरा धक्का बसल्याची नोंद यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने केली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू सागाइंगपासून १८ किमी दक्षिणेला होता. म्यानमारमध्ये भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात नासधूस झाली असून, अनेक इमारती कोसळल्या आहेत. बचाव पथकांनी बचावकार्य सुरू केले आहे, मात्र ढिगाऱ्याखाली अनेक जण अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्यानमारमध्ये या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे.



भारताने 'ऑपरेशन ब्रह्मा' अंतर्गत म्यानमारला तातडीने मदतीचा हात दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमारच्या लष्करी शासक मिन आंग हलाईंग यांच्याशी संवाद साधून दुःख व्यक्त केले. त्यांनी ट्विटद्वारे सांगितले की, भारत या कठीण प्रसंगी म्यानमारच्या जनतेच्या सोबत आहे. भारतीय लष्कराच्या ११८ सदस्यीय फील्ड हॉस्पिटल युनिटला म्यानमारमध्ये तैनात करण्यात आले आहे. हे पथक प्रथमोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरवेल. तसेच, भारतीय नौदलाच्या ' आयएनएस सातपुडा ' आणि 'आयएनएस सावित्री' या युद्धनौकांद्वारे ४० टन मानवतावादी मदत पाठवण्यात आली आहे. याशिवाय, एनडीआरएफ च्या ८० सदस्यांचे पथक बचाव कार्यासाठी रवाना झाले आहे. भारतीय हवाई दलाच्या सी – १३० विमानाद्वारे ताडपत्री, ब्लँकेट्स, अन्नधान्य, स्वच्छता किट, सौर दिवे आणि औषधांचा साठा म्यानमारला पाठवण्यात आला आहे. भूकंपानंतर थायलंडमधील बँकॉक शहरात ३० मजली इमारत कोसळल्याने अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. बचाव कार्य सुरू असून, आणखी हानी होण्याची शक्यता आहे. यासोबतच, म्यानमारच्या इरावदी नदीवरील मोठा पूल कोसळल्याचे वृत्त आहे. भूकंपामुळे राजधानी नायपीडॉमध्ये रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात भगदाडे पडली आहेत. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने भूकंपाच्या केंद्रबिंदूची खोली १० किलोमीटर असल्याचे नमूद केले आहे. चीनच्या शिन्हुआ वृत्तसंस्थेनुसार, चायना अर्थक्वेक नेटवर्क सेंटरने भूकंपाची तीव्रता ७.९ रिश्टर स्केल असल्याचे सांगितले आहे. जगभरातील अनेक देशांनी म्यानमारला मदत पाठवण्याची तयारी दर्शवली आहे. म्यानमार सरकार तातडीच्या मदत आणि पुनर्वसन यंत्रणेसोबत आढावा बैठक घेत आहे.

